वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरुवार दि. २ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

Email.- dailydivyawarta@Gmail.com Email.-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

# ‘तीन महिन्यांत राज्यातलं सरकार कोसळणार’

## आ.उत्तम जानकरांचा खळबळजनक दावा

**मुंबई, (दिव्य न्युज):- राज्यात पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आलं आहे, विधानसभा निवडणुकीमध्ये महायुतीला स्पष्ट बहुमत मिळालं. महायुतीचे प्रमुख घटक पक्ष भाजपला राज्यात सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या शिवसेनेला ५७ तर राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४१ जागा मिळाल्या, तर दुसरीकडे महाविकास आघाडीला तीनही पक्ष मिळून केवळ ५० जागाच जिंकता आल्या. विधानसभेत झालेल्या पराभवानंतर महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून आता ईव्हीएमवर शंका उपस्थित करण्यात येत आहे.**

दरम्यान दुसरीकडे महायुतीच्या नेत्यांकडून देखील महाविकास आघाडीच्या नेत्यांना तोडीस तोड प्रत्युत्तर दिलं जातं आहे. लोकसभेत त्यांना चांगलं यश मिळालं तेव्हा त्यांना ईव्हीएमवर शंका नव्हती मात्र आता विधानसभेत पराभव झाला तर ईव्हीएमवर शंका उपस्थित केली जात आहे, असं उत्तर महायुतीकडून महाविकास आघाडीला देण्यात येत आहे. ईव्हीएमवरून आरोप-प्रत्यारोप सुरू असतानाच आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते आमदार उत्तमराव जानकर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. या वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आलं आहे. ते पंढरपुरात बोलत होते.



‘तीन महिन्यात राज्यातलं सरकार पडणार आहे, त्याचे पुरावे मी सादर केल्यावर देश गडबडून जाईल. सरकार शंभर टक्के जाणार आणि पुन्हा निवडणुका घ्यावा लागणार’ असा दावा आमदार उत्तम जानकर यांनी केला आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, ईव्हीएम मशीनमध्ये घोटाळा नसेल तर माळशिरस विधानसभा ▶▶ पान २ वर

# बीड प्रकरणात उज्ज्वल निकमांची नियुक्ती ?

## आरोपीसाठी पलंग आणले ? ; मुख्यमंत्र्यांनी केला खुलासा

बीड , (दिव्य न्युज):- बीडमधील पवनचक्की कंपनीला खंडणी मागितल्याप्रकरणी गुन्हा दाखल झालेला आणि सरपंच हत्या प्रकरणातील संशयित आरोपी वाल्मीक कराड सध्या पोलीस कोठडीत आहे. मात्र कराड याच्या सेवेसाठी पोलिस विभागाने चार ते पाच पलंग आणल्याचा आरोप राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्यासह विरोधी पक्षातील इतर नेत्यांनी केला होता. याबाबत उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांचा खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. प्रसिद्धीचा हव्यास असणारे नेते अशा प्रकारचा आरोप करत असून ते पलंग तपासासाठी आलेल्या पोलिस अधिकाऱ्यांसाठी आणल्याचं स्पष्टीकरण मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिलं आहे.

बीड हत्या प्रकरणात उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्याबाबत ▶▶ पान २ वर

# सय्यद जावेद अली यांना द स्कूल एक्सप्रेसचा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर

धारूर , (दिव्य न्युज):-धारूर येथील मिलिया प्राथमिक शाळा चे मुख्याध्यापक श्री सय्यद जावेद अली यांना द स्कूल एक्सप्रेस च्या वतीने आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार जाहीर झाला आहे.

या कार्येक्रमाचे बक्षीस वितरण सोहळा दिनांक ५ जानेवारी रविवार रोजी ११ वाजता अहेमद नगर रोड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर भवन मध्ये होणार आहे.मागील १८ वर्षा पासून ते मिलिया प्राथमिक शाळा धारूर येथे सह शिक्षक पदा वरील कार्येरत आहे. विध्यार्थ्यांना शिक्षणासाहीत इतर उपक्रमात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. धारूर शहरात बहू प्रचित असे त्यांची ओळख आहे शिक्षण चे वितरिक्त शाळेत इतर सामाजिक उपक्रम राबवित आहे.



यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना कोरोना काळात उत्कृष्ट कामगिरी ने प्रामाणित करण्याय आले.या सर्व कामांची दखल घेऊन बीड येथील प्रसिद्ध स्कूल एक्सप्रेस च्या वतीने त्यांना आदर्श मुख्यधयपाक पुरुस्कार जाहीर करण्यात ▶▶ पान २ वर

# केसापूर कॅम्प येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या कामावरून मुरुमाची विक्री !

## हजारो ब्रास मुरूम गुत्तेदाराकडून विक्री



माजलगाव, (दिव्य न्युज):-तालुक्यातील केसापुरी कॅम्प या ठिकाणी मागील एक ते दीड वर्षांपासून उपजिल्हा रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. या रुग्णालयाच्या पाठीमागील भागातुन मोठ्या प्रमाणात खोदकाम करून हजारो ब्रास मुरूम संबंधित गुत्तेदाराकडून विनापरवाना विक्री करून या माध्यमातून लाखो रुपये कमवल्याचा आरोप या भागातील नागरिकांनी केला आहे.

माजलगाव शहरापासून जवळच असलेल्या केसापुरी कॅम्प या ठिकाणी उपजिल्हा ▶▶ पान २ वर

# अजित पवारांच्या ताफ्यात वाल्मिक कराड यांची गाडी; त्याच गाडीतून पुण्यात सरेंडर केले

## खासदार बजरंग सोनवणे यांचा खळबळजनक दावा



मुंबई , (दिव्य न्युज):- बीड सरपंच हत्याप्रकरणाशी निगडीत खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड सध्या सीआयडीच्या ताब्यात असून त्याची चौकशी केली जात आहे. बीड खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मीक कराड आणि अजित पवारांबाबत मोठा दावा केला आहे. अजित पवार मस्साजोगमध्ये देशमुख कुटुंबीयांची भेट घेण्यासाठी गेले असता, त्यांच्या ताफ्यात वाल्मीक कराड यांची देखील गाडी होती, असे सोनवणे म्हणालेत. त्याच गाडीतून त्याने पुण्यात सरेंडर केले, असा दावाही बजरंग सोनवणे यांनी केला.

संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणामुळे राज्यात आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. वाल्मीक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. त्यात आता खासदार बजरंग सोनवणे यांनी वाल्मिक कराड सरेंडर झालेल्या गाडीविषयी मोठा गौप्यस्फोट केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

१२ तारखेला वाल्मीक कराड आणि पोलिस यंत्रणेची नेत्याच्या कार्यालयात भेट झाली. तसेच १५ तारखेला मंत्रिमंडळाच्या शपथविधी ▶▶ पान २ वर

# सरपंच हत्ये प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले देशाबाहेर फरार ?

बीड , (दिव्य न्युज):- बीडमधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराड हा सध्या तुरुंगात आहे. त्याची सध्या कसून चौकशी केली जातेय. आतापर्यंत या प्रकरणात जयराम चाटे, महेश केदार, प्रतीक घुले, विष्णू चाटे यांना अटक करण्यात आली आहे. तर, मुख्य आरोपी सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे फरार आहेत.



संतोष देशमुख यांच्या हत्येला तबबल २५ दिवस उलटून गेल्यानंतरही अद्याप तीन मारेकरी फरार आहेत. यामुळे मस्साजोग गावकऱ्यांसह राज्यातील विरोधी पक्षाकडूनही बीड पोलीस आणि सीआयडीच्या कार्यक्षमतेवर शंका उपस्थित करण्यात येत आहे. या प्रकरणी तपास करण्यासाठी सीआयडीची एकूण ९ पथके तयार करण्यात आली असून त्यामध्ये जवळपास १५० जणांचा समावेश आहे. तर, आजच एसआयटीची देखील स्थापना करण्यात आलीये.

इतकी मोठी टीम असूनही अजून इतर तीन आरोपी हातात आले नाहीत. अशातच संतोष देशमुख प्रकरणातील एक मारेकरी देश सोडून पळाल्याची माहिती समोर आली आहे. सरपंच हत्येतील मुख्य आरोपी सुदर्शन घुलेच्या शोधासाठी सात पथके विविध राज्यासह देशभर रवाना करण्यात आली आहेत. सुदर्शन घुले हा सराईत गुन्हेगार असून तो नेपाळमध्ये जाऊन लपला असल्याची माहिती आहे.

काही मीडिया रिपोर्टमध्ये हा दावा करण्यात आलाय. संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर सुदर्शन घुले हा नेपाळला लपल्याची माहिती आहे. सीआयडीची पथके सध्या त्याचा कसून शोध घेत आहे. तो देशाबाहेर ▶▶ पान २ वर

# एसआयटीचे पथक ॲक्शन मोडवर

## केजमध्ये दाखल होताच सीआयडीकडून घेतली माहिती

बीड , (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या करण्यात आली. त्यांनतर राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. या घटनेला २४ दिवस पूर्ण झाले ▶▶ पान २ वर



# इज्तेमासाठी पाडळसिंगी टोल माफ करा

## बीडच्या खासदारांचे व आमदारांचे आयआरबीला पत्र

बीड, (दिव्य न्युज):- इस्लाम व मानवतेची शिकवणूक देण्यासाठी प्रसिद्ध असलेल्या इज्तेमाचा यावर्षीचा कार्यक्रम आंबेजोगाई येथील चांदमारी ग्राउंड सदर बाजार येथे दोन व तीन जानेवारी २०२५ ला होत आहे. मानवतेच्या कल्याणासाठी लोकांनी स्वत:ची वागणूक चांगली करावी तसेच अन्य समाज प्रबोधनाचे व्याख्यान तिथे होणार आहे. या अनुषंगाने त्यास उपस्थिती लावण्यासाठी मुस्लिम बांधव हजारोचे संख्येने प्रत्येक तालुका व गावातून येतील. लोकांचा प्रवास हा सुखरूप





असावा व इतर प्रवाशांना गर्दीचा सामना करावा लागू नये यासाठी बीडचे खा. ▶▶ पान २ वर

# वाल्मिक कराडचा दरबार भरणारे ‘जगमित्र’ ओस

## परळीतील याच संपर्क कार्यालयातून कराड हलवायचे जिल्ह्यातील सूत्रे

**परळी, (दिव्य न्युज):- जिल्ह्याचे सत्ताकेंद्र बनलेल्या मंत्री धनंजय मुंडे यांचे परळी येथील जगमित्र संपर्क कार्यालय चोवीस तास कार्यकर्ते व समर्थकांच्या गर्दीने गजबजून गेलेले असायचे. मस्साजोग घटनेनंतर हे कार्यालय ओस पडले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारीही जगमित्रकडे फिरकत नसल्याचे दिसत आहे. त्यातच मंगळवारी वाल्मीक कराड हे सीआयडीसमोर शरण आले. त्यामुळे दिवसभर या कार्यालयात शुकशुकाट होता.**

अन्न व नागरी पुरवठामंत्री धनंजय मुंडे यांचे परळी शहरातील जगमित्र कार्यालय हे नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी संपर्काचे ठिकाण बनले होते. मुंडे यांचे विश्वासू समजले जाणारे वाल्मीक कराड हेदेखील येथूनच आपला कारभार चालवायचे. दिवसभर इथेच बसून ते जिल्हाभरातील यंत्रणा हलवत होते. त्यामुळे जगमित्र कार्यालय हे जिल्ह्याचे सत्ताकेंद्र तयार झाले होते.

दरम्यान, मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेनंतर कराड यांचे या प्रकरणाशी नाव जोडले जाऊ लागले. पाठोपाठ कराड यांच्यावर २ कोटींच्या खंडणीचा गुन्हा नोंदवला गेला आणि कराड हे फरार झाले. त्यामुळे जगमित्र कार्यालयातील गर्दी कमी होऊ लागली होती. कार्यालयात ▶▶ पान २ वर



